

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक २७] बुधवार, जुलै १५, २००९/आषाढ २४, शके १९३१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्र. ५४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous Persons (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. X of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons (Amendment) Ordinance, 2009 (Mah. Ord. X of 2009), published under the authority of the Governor.).

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 15th July 2009.

MAHARASHTRA ORDINANCE No. X OF 2009.

AN ORDINANCE

further to amend the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons Act, 1981.

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons Act, 1981, for the purposes hereinafter appearing ;

Mah. LV of 1981.

AND WHEREAS the instructions of the President under the proviso to clause (1) of Article 213 of the Constitution of India have been obtained.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

1. (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons (Amendment) Ordinance, 2009.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of long title of Mah. LV of 1981.

2. In the long title of the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons Act, 1981 (hereinafter referred to as " the principal Act "), for the words " Drug-offenders and Dangerous persons " the words " Drug-offenders, Dangerous persons and video pirates " shall be substituted. Mah. LV of 1981.

Amendment of section 1 of Mah. LV of 1981.

3. In section 1 of the principal Act, in sub-section (*1*), for the words " and Dangerous persons " the words ", Dangerous persons and video pirates " shall be substituted.

Amendment of section 2 of Mah. LV of 1981.

4. In section 2 of the principal Act—

(*a*) in clause (*a*),—

(*i*) after sub-clause (*iv*), the following sub-clause shall be added, namely :—

" (*v*) in the case of video pirate, when he is engaged or is making preparations for engaging in any of his activities as a video pirates, which affect adversely or likely to affect adversely, the maintenance of public order. " ;

(*ii*) in the *Explanation,* the following portion shall be added at the end, namely :—

" or disturb the life of the community by producing and distributing pirated copies of music or film products, thereby resulting in a loss of confidence in administration" ;

(*b*) after clause (*f*), the following clause shall be inserted, namely :—

"(*f-1*) "video pirate" means a person against whom at least one chargesheet has already been filed under the Copyrights Act, 1957 for Infringement of Copyrights relating to cinematograph film or sound recording and the Court has taken cognizance of such offence; and who commits or attempts to commit or abets the commission of offences of infringement of copyrights in relation to cinematograph film or sound recording or any part of sound track associated with the film or sound recording, punishable under the said Act;".

Act XIV of 1957.

5. In section 17 of the principal Act,— Amendment of section 17 of Mah. LV of 1981.

(*a*) in clause (*a*), the word "and" shall be deleted;

(*b*) in clause (*b*), the word "and" shall be added at the end;

(*c*) after clause (*b*), the following clause shall be added, namely :—

"(*c*) on and after the commencement of the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons (Amendment) Ordinance, 2009, in respect of any video pirate,".

Mah. Ord. of 2009.

STATEMENT

The Film Industry is facing a severe crisis because of the prevalence of the video piracy which results in audience staying away from theatres and loss of revenue to the Government, producers, distributors and theatre owners. Representatives of different associations of the Film industry have made representations to the Government to eradicate this menace and put the Film industry on the revival path. Apart from this, the prevalence of video piracy results in confrontation between various sections of the public and the film producers, distributors, etc.

2. As video piracy is an act prejudicial to the maintenance of public order, the Government of Maharashtra considers it expedient to amend the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons Act, 1981, on the lines of the amendments made by the Government of Tamil Nadu by the Tamil Nadu Prevention of Dangerous Activities of Bootleggers, Drug-offenders, Forest Offenders, Goondas, Immoral Traffic Offenders and Slum Grabbers (Amendment) Act, 2004 (Tamil Nadu Act No. X of 2004), so as to enable the authorities concerned to detain any video pirate under the said Act with a view to preventing him from acting in any manner prejudicial to the maintenance of public order. Beside, by way of an additional safeguard, it is provided that a person against whom at least one chargesheet has already been filed under the Copyrights Act, 1957 for infringement of Copyrights relating to cinematograph film or sound recording and the Court has taken cognizance of such offence, can only be detained as a video pirate.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Prevention of Dangerous Activities of Slumlords, Bootleggers, Drug-offenders and Dangerous persons Act, 1981 (Mah. LV of 1981), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 14th July 2009.

S. C. JAMIR,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANNA DANI,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १६] बुधवार, जुलै १५, २००९/आषाढ २४, शके १९३१ [पृष्ठे ४, किंमत रुपये १८.००

असाधारण क्रमांक ३६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जुलै २००९

MAHARASHTRA ORDINANCE No. X OF 2009.

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS, BOOTLEGGERS, DRUG OFFENDERS AND DANGEROUS PERSONS ACT, 1981.

सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.

महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९८१ चा महा. ५५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती अधिनियम, १९८१ यात आणखी

सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) च्या परंतुकान्वये राष्ट्रपतींचे अनुदेश मिळविण्यात आले आहेत ;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २००९ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या पूर्ण नावाची सुधारणा.

२. महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती अधिनियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या पूर्ण नावामध्ये " औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती " या मजकुराऐवजी, " औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९८१ चा महा. ५५.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १ मध्ये, पोट-कलम (१) मधील " व धोकादायक व्यक्ती " या मजकुराऐवजी, " ,धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(क) खंड (अ) मध्ये,—

(एक) उपखंड (चार) नंतर, पुढील उपखंड जादा दाखल करण्यात येईल :—

(पाच) दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, ज्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचेल किंवा बाधा पोहचवण्याचा संभव असेल असे दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती म्हणून ती करीत असेल किंवा करण्याच्या तयारीत असेल अशा कृत्यांपैकी कोणतेही कृत्य. ".

(दोन) स्पष्टीकरणामध्ये, " आरोग्याला गंभीर किंवा विस्तृत प्रमाणावर धोका निर्माण होत असेल किंवा असा धोका निर्माण होण्याचा संभव असेल " या मजकुरानंतर पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

" किंवा संगीत कलाकृतीच्या किंवा चित्रपट कलाकृतीच्या विनापरवाना प्रती काढून आणि त्यांचे वितरण करून जनजीवनात अस्वस्थता निर्माण करीत असेल व त्यामुळे प्रशासनावरील विश्वास गमावला जात असेल " ;

(ख) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (फ-१) " दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती " म्हणजे, ज्या व्यक्तीविरुद्ध कॉपीराईट अधिनियम, १९५७ अन्वये चलचित्रपटाशी किंवा ध्वनिमुद्रणाशी संबंधित कॉपीराईटच्या उल्लंघनासाठी यापूर्वी किमान एक तरी आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे आणि न्यायालयाने अशा अपराधाची दखल घेतलेली आहे ; आणि जिने चलचित्रपट किंवा ध्वनिमुद्रण अथवा चित्रपटातील किंवा ध्वनिमुद्रणातील ध्वनिमुद्रणाचा कोणताही भाग यांच्या संबंधातील कॉपीराईटचे उल्लंघन करणारे व उक्त अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेले असे अपराध केले आहेत किंवा करण्याचा प्रयत्न केला आहे अथवा असे अपराध करण्याची अपप्रेरणा दिली आहे, ती व्यक्ती होय ; ". १९५७ चा १४.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये,— सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १७ ची सुधारणा.

(क) खंड (अ) मध्ये " आणि " हा शब्द वगळण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये, शेवटी " आणि " हा शब्द जादा दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ब) नंतर पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— २००९ चा महा. अध्या.

" (क) महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २००९ याच्या प्रारंभाच्या दिवशी आणि त्यानंतर, कोणत्याही दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, ".

निवेदन.

दृकश्राव्य कलाकृतींच्या विनापरवाना प्रदर्शनाचे (व्हिडिओ पायरसी) सर्वत्र पेव फुटलेले आहे व त्यामुळे सध्या प्रेक्षक चित्रपटगृहांकडे फिरकत नसल्याने शासन, चित्रपट निर्माते, वितरक व चित्रपटगृह-मालक या सर्वांना मिळणाऱ्या महसुलाची हानी होत आहे आणि चित्रपट उद्योगावर आणीबाणीची वेळ आली आहे. शासनाने या संकटाचे निवारण करून चित्रपटसृष्टीमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण करावे याकरिता, चित्रपट उद्योगातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी शासनाला अभिवेदने सादर केलेली आहेत. याशिवाय, दृकश्राव्य कलाकृतींच्या अशा विनापरवाना प्रदर्शनाच्या परिणामी, जनतेचे विविध घटक आणि चित्रपट निर्माते, वितरक, इत्यादींमध्ये देखील मतभेद, वाद निर्माण होत आहेत.

२. दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन हे, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक ठरेल अशा प्रकारचे कृत्य आहे. त्यामुळे दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्तीला सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधक ठरेल अशा प्रकारचे कार्य करण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने या अधिनियमाखाली तिला स्थानबद्ध करणे संबंधित प्राधिकाऱ्यांना शक्य व्हावे म्हणून, महाराष्ट्र शासनास तामिळनाडू सरकारने, तामिळनाडू हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, वनविषयक गुन्हेगार, गुंड, अनैतिक व्यापार करणारे गुन्हेगार आणि झोपडपट्टी बळकवणारे चोर यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २००४ (२००४ चा तामिळनाडू अधिनियम क्र. १०) याद्वारे केलेल्या सुधारणांच्या धर्तीवर, महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ यामध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते. शिवाय अतिरिक्त खबरदारी म्हणून, जिच्याविरुद्ध कॉपीराईट अधिनियम, १९५७ अन्वये चलचित्रपटाशी किंवा ध्वनिमुद्रणाशी संबंधित कॉपीराईटच्या उल्लंघनासाठी किमान एक तरी आरोपपत्र दाखल करण्यात आले असेल आणि न्यायालयाने त्या अपराधाची दखल घेतलेली असेल अशा व्यक्तीलाच केवळ, दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती म्हणून स्थानबद्ध करता येऊ शकेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. ५५) यामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ जुलै २००९.

एस. सी. जमीर,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ॲना दाणी,
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.